**वादीतर्फे साक्षीदार क्र. १ चा शपथेवर उलटतपास प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे विधिज्ञ श्री. एम. ए. सोन्ने यांचेमार्फत शपथेवर सुरू :–**

०६. प्रतिवादी क्र. १ हा माझा सावत्र भाऊ आहे. माझ्या वडीलाचे नाव बाबु किसन अहिरे आहे. माझे वडील बाबु यांना श्रीरंग व विश्वनाथ असे दोन भाऊ होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील व चुलत्याने एक इसार पावती केली होती. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, इसार पावती आम्ही केली होती. सदरची इसारची पावती साहेबराव, गुलाबराव व मी केली होती. सदरची इसार पावती राजुबाई निबांळकर यांनी केली होती. सदरची इसार पावती अंदाजे १९७९ ला केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या इसार पावतीत सगळ्यांचे हिस्से समान म्हणून लिहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, इसार पावतीवेळी सिद्धार्थ लहान होता म्हणून त्याचे नाव इसार पावतीत घेतले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, इसार पावती झाल्यानंतर आमच्या तिघांच्यात वाटण्या झाल्या. हे म्हणणे खरे नाही की, सिद्धार्थला पण त्याची त्याची वाटणी दिली. हे म्हणणे खरे नाही की, आता सिद्धार्थ जी जमीन खातो ती त्याला वाटून मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, सिद्धार्थ व माझ्यामध्ये अद्याप वाटणीपत्र झालेले नाही.

०७. हे म्हणणे खरे नाही की, सिद्धार्थ हा माझा भाऊ असल्यामुळे वडिलोपार्जित जमीनीत सिद्धार्थचा हिस्सा आहे. मला डोकेवाडी येथे कोणता गट क्रमांकामध्ये माझी जमीन आहे हे मला सांगता येत नाही. डोकेवाडीत सगळ्यांची मिळुन १५ एकर जमीन आहे माझ्या एकट्याची ३ एकर आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जमिनीपैकी काही हिस्सा मी विकला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सिद्धार्थ व माझे एकत्र कुटुंब आहे. हे म्हणणे खरे नाही की, सिद्धार्थ ने दावा मिळकतीच्या वहिवाटीस मला कधीही हरकत अडथळा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, इसार पावतीवेळी सिद्धार्थ लहान असल्याने त्याचे नाव त्यात लिहिले नाही; परंतु त्यावेळी त्याचा हिस्सा त्याला देवून टाकला होता. हे म्हणणे खरे आहे की, गुलाब, साहेबराव व माझ्यातील

भांडणे आता मिटले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ हा सावत्र भाऊ असल्याने त्याचिविरुद्ध आज खोटा दावा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटे शपथपत्र देवून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

दिनांक – २३.०१.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृत

PRATIBHA PRABHAKAR KHAPE
Digitally signed by PRATIBHA PRABHAKAR KHAPE
Date: 2026.01.23 15:29:42 +0530

**(श्रीमती पी.एस.जाधव)**

२रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, भूम.